**ठळक बातम्या**

- भारत ही गौतम बुद्ध आणि महात्मा गांधींची भूमी असल्यानं शांततेविषयी भारत बोलतो तेव्हा जग ऐकतं, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन, दहाव्या रायसीना संवादाचं उद्या प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- भारत आणि न्यूझीलंड यांच्यात मुक्त व्यापार कराराबाबत वाटाघाटी सुरु

- अंतराळ स्थानकावर अडकलेले वैज्ञानिक सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर यांना परत आणण्यासाठी गेलेलं स्पेसएक्सचं कॅप्सूल आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात दाखल

- येत्या दोन दिवसात विदर्भासह देशाच्या विविध भागांत उष्णतेची लाट येण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**आणि**

- मास्टर्स लीग स्पर्धेच्या विजेतेपदासाठी भारत आणि वेस्ट इंडीज यांची लढत सुरु /नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा वेस्ट इंडीजचा निर्णय

**<><><><><>**

भारत हा उदासीन नाही, तर शांततेसाठी ठामपणे वचनबद्ध आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. एआय संशोधक आणि पॉडकास्टर लेक्स फ्रिडमन यांनी घेतलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

भारत ही गौतम बुद्ध आणि महात्मा गांधींची भूमी आहे, त्यामुळे भारत जेव्हा शांततेविषयी बोलतो तेव्हा जग ऐकतं, भारतीय नेहमी सद्भावना आणि शांततेसाठी ठाम भूमिका घेतात, असंही ते यावेळी म्हणाले. या मुलाखती दरम्यान मोदी यांनी

यूक्रेन आणि रशिया संघर्षावरच्या प्रश्नालाही उत्तर दिलं. दोन्ही देश जेव्हा वाटाघाटी करण्याच्या भूमिकेत येतील तेव्हाच हा संघर्ष थांबेल, असं ते यावेळी म्हणाले.

मोदी यांनी यावेळी भारत आणि चीन संबंधांवरही आपली मतं मांडली. दोन्ही देशांमध्ये प्राचीन संस्कृतीच्या वारशाचा एक समान धागा आहे. दोन्ही देशांनी जगाच्या कल्याणात आपलं योगदान दिलं आहे. शेजारी देशांमध्ये मतभेद होऊ शकतात पण त्यांचं रुपांतर युद्धात होऊ नये, यावर लक्ष केंद्रित करण्याची गरजही मोदी यांनी यावेळी व्यक्त केली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं रायसीना संवाद २०२५ चं उद्घाटन करणार आहेत. या संवादाचं हे दहावं वर्ष आहे. न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झन हे या संवादाच्या उद्घाटनाच्या सत्राला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील आणि उपस्थितांशी संवाद साधतील. याशिवाय, पाच दिवसांच्या दौऱ्यादरम्यान ते मुंबईलाही भेट देणार आहेत.

यंदा रायसीना संवादाची मध्यवर्ती संकल्पना ‘कालचक्र - नागरिक, शांतता आणि पृथ्वी’ अशी आहे. उद्यापासून १९ तारखेपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमात १२५ देशांमधून विविध क्षेत्रांमधले आघाडीचे नागरिक सहभागी होणार आहेत. यासाठी विविध देशांचे प्रतिनिधी नवी दिल्लीला पोहोचत आहेत.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांनी आज मुक्त व्यापार कराराबाबतच्या वाटाघाटींना प्रारंभ केला. भारताचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल आणि न्यूझीलंडचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री टॉड मॅकक्ले यांच्यात आज नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. दोन्ही देशांमधल्या आर्थिक आणि व्यापारी संबंधांची मजबूत पायाभरणी करणाऱ्या एका मोठ्या भागीदारीची सुरुवात यामुळे होत असल्याचं गोयल म्हणाले. दोन्ही देशातला व्यापार सतत वाढत असून एप्रिल

२०२४ ते जानेवारी २०२५ या काळात त्यानं १ अब्ज अमेरिकन डॉलरचा टप्पा ओलांडला आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीकरता भाजपानं तीन उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. यात छत्रपती संभाजीनगर इथले संजय केणेकर, नागपूरमधले संदीप जोशी आणि वर्ध्यातले दादाराव केचे यांचा समावेश आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना प्रत्येकी एका जागेवर उमेदवार देणार आहे.

ही निवडणूक २७ मार्च रोजी होणार आहे आणि त्याचदिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल. आमश्या पाडवी, प्रवीण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधानसभेत निवडून आल्यानं रिक्त झालेल्या जागांसाठी ही निवडणूक होते आहे. विधानसभा आमदारांमधून ही निवडणूक होणार आहे.

<><><><>

मुंबईत होऊ घातलेल्या वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटच्या निमित्तानं गेमिंग स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गेम विकसित करण्याचा अनुभव मिळणार असून, त्यांच्या कल्पकतेला चालना मिळेल. ही स्पर्धा इंडिया गेम डेव्हलपर कॉन्फरन्सच्या सहकार्याने आयोजित केली आहे. या स्पर्धेसाठी नोंदणीसह अधिक माहितीकरता आपण वेव्ह्ज इंडिया डॉट ओआरजी या संकेतस्थळाला भेट देऊ शकता.

<><><><>

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर अडकलेले अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर यांना परत आणण्यासाठी गेलेलं स्पेसएक्सचं कॅप्सूल आज सकाळी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर पोहोचलं. यात अमेरिका, जपान आणि

रशियाच्या चार अंतराळवीरांचा समावेश आहे. सुनीता विल्यम्स आणि बुच विलमोर येत्या बुधवारी पृथ्वीच्या दिशेने प्रवास सुरू करतील, अशी अपेक्षा आहे. त्यांची जागा हे चार नवे अंतराळवीर घेतील. हे दोघे फक्त एका आठवड्यासाठी अवकाशात गेले होते, मात्र तांत्रिक बिघाडामुळे त्यांचा तिथला मुक्काम नऊ महिन्यांपर्यंत पोहोचला.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात विदर्भ, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, उत्तर तेलंगणा, पश्चिम बंगाल, सौराष्ट्र तसंच कच्छ या भागांत उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. ओदिशालाही आज उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट देण्यात आला असून पुढचे दोन दिवस झारखंड आणि पश्चिम बंगालला यलो अलर्ट देण्यात आहे. दरम्यान, उत्तराखंड आणि अरूणाचल प्रदेशात पुढच्या दोन दिवसात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसंच, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरात विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><><>**

मास्टर्स लीग स्पर्धेचा अंतिम सामना आज मध्य प्रदेशात रायपूर इथं सुरु आहे. सचिन तेंडुलकरच्या नेतृत्वाखाली भारतीय मास्टर्स संघ आणि ब्रायन लाराच्या नेतृत्वाखाली वेस्ट इंडीज मास्टर्स संघ यांच्यातली ही लढत संध्याकाळी साडे सात वाजता सुरु झाली. वेस्ट इंडीजनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा वेस्ट इंडिजच्या ७ षटकात २ बाद ५५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

विदर्भात धवलक्रांती घडवण्यासाठी एनडीडीबी, अर्थात राष्ट्रीय दूध उत्पादन विकास महामंडळाद्वारे संचालित मदर डेअरी सहाय्यभूत ठरेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला आहे. ते आज नागपुरात मदर डेअरी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचं भूमीपूजन करताना बोलत होते.

मदर डेअरीनं आता पशुवैद्यक तज्ञांच्या मदतीनं स्थानिक गाईंच्या चांगल्या वाणांसाठी पुढाकार घेणं आवश्यक आहे, असं ते म्हणाले. दररोज सुमारे १२ ते १५ लिटर दूध देणाऱ्या गाई विकसित केल्या तर महाराष्ट्राला हरियाणा किंवा पंजाब येथील गाई येथे आणण्याची गरज पडणार नाही, असं गडकरी म्हणाले. जिल्हानिहाय पशुधन विकसित करून ते किफायतशीर किमतीमध्ये दूध उत्पादकांना उपलब्ध करून देण्याची सूचना त्यांनी मदर डेअरीला केली.

<><><><><>

नवी मुंबईतल्या नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन लांबणीवर पडलं आहे. अदानी उद्योगसमूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी आज या विमानतळाच्या बांधकामाला भेट दिली आणि येत्या जूनमधे त्याचं उद्घाटन होईल असं समाजमाध्यमावर लिहीलं आहे. या आधी येत्या १७ एप्रिलपर्यंत आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन होईल, असं अदानी समूहातर्फे सांगण्यात आलं होतं. अदानी उद्योगसमूह आणि सिडकोच्या भागीदारीतून उभारण्यात येणाऱ्या या विमानतळाची क्षमता एका वर्षात ९ कोटी प्रवाशांची ये-जा हाताळण्याची असेल.

<><><><><>

'कोकणात सापडलेली खनिजं आणि नैसर्गिक साधनसंपत्ती उद्योगपतींना देण्याचा सरकारचा मानस आहे. उद्योगपतींना लूट करता यावी यासाठी इथलं सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचं कारस्थान सत्ताधाऱ्यांकडूनच केलं जात आहे,' अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. ते आज रत्नागिरीत, वार्ताहर परिषदेत बोलत होते.

<><><><>

बचत गटांतल्या महिलांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळवून देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात, यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत, त्यातून महिलांचं, त्यांच्या कुटुंबाचं आयुष्यमानही सुधारणार आहे, असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज सांगितलं. ते सांगलीमध्ये आयोजित दख्खन जत्रा या महिला स्वयंसहाय्यता गटांच्या वस्तुंचं आणि ग्रामीण भागातल्या शेतकरी उत्पादनांच्या विभागस्तरीय प्रदर्शनाचं उद्धाटन करताना बोलत होते.

<><><><>

मॅसेडोनियाच्या पूर्वेला असलेल्या कोकनी शहरातल्या एका नाईटक्लबमध्ये आज पहाटे लागलेल्या आगीत ५१ जण ठार तर शंभरहून अधिक लोक जखमी झाले आहेत.

<><><><>

अमेरिकेच्या आग्नेय भागात झालेल्या वादळामुळं किमान ३४ जणांचा मृत्यू झाला असून घरं आणि वाहनांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. वादळाचा फटका अनेक राज्यांना बसला आहे. मिशिगन, मिसुरी, इलिनॉईस या राज्यांसह सात राज्यांत अडीच लाख घरांतील वीज पुरवठा खंडीत झाला आहे. या भागात वादळ आणखी तीव्र होण्याची शक्यता असून मध्य मिसिसिपी, ईशान्य लुईझियाना आणि टेनिसीचा पश्चिम भाग, तसंच अलाबामा आणि अर्कान्सास या भागात वादळाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. जॉर्जियाचें गव्हर्नर यांनी ब्रायन केम्प यांनी आणीबाणी जाहीर केली आहे.

<><><><>

आज देशभर राष्ट्रीय लसीकरण दिन साजरा करण्यात आला. लसीकरणाबाबत जनजागृतीसाठी दरवर्षी १६ मार्च रोजी राष्ट्रीय लसीकरण दिन

साजरा केला जातो. १९९५ साली याच दिवशी प्रथमत: देशातून पोलिओ निर्मूलनासाठी तोंडाद्वारे लस द्यायला सुरुवात झाली होती. देशातल्या प्रत्येक बालकाचं रोगसंसर्गापासून संरक्षण करण्याच्या हेतूनं लसीकरण आवश्यक असल्याचं आरोग्य मंत्रालयानं समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार बोडोलॅंड प्रदेशाच्या विकासासाठी वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. ते आसाममध्ये कोक्राझार इथं ऑल बोडो स्टुडन्ट्स युनियनच्या ५७ व्या वार्षिक परिषदेला आज संबोधित करत होते. बोडो करारातल्या सर्व अटी पूर्ण करण्यासाठी सरकार वचनबद्ध असून ८२ टक्के अटी पूर्ण झाल्या आहेत, असं गृहमंत्री म्हणाले.

**//<><><><><>//**